<u>नियमीत फौ. ख.क्र. ९१/२०११</u>
सरकार विरुध्द परशुराम वगैरे
निशाणी क्र. १४८

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र (११) यांची जबानी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नांवः– उषा राम चिंतामणी,
वय सुमारेः– ५० वर्ष, व्यवसायः– घरकाम,
निवासस्थानः– पाथर्डी, ता. पाथर्डी जि. अहमदनगर

## सर तपासणी

**अभियोग पक्षाकरिता श्रीमती. ए. बी. कुलकर्णी सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**

फिर्यादी मुकूंद हे माझे दिर आहेत. मी आरोपींना ओळखत नाही. घटना सन २००८ मध्ये घडली होती. घटनेवेळी माझ्या दिराचे मित्र सुभाष सानप यांनी माझ्या दिराला सोने काढुन देतात असे सांगितले होते. त्यानंतर माझे दिर व सुभाष सानप हे आरोपी क्र.१ कडे गेले होते. त्यावेळी परशुराम बिनवडे यांनी माझ्या दिराला तु भाग्यवान आहेस, तुझ्या घरामध्ये ३६ किलो सोने आहे असे सांगितले. त्यानंतर माझे दिर घरी आले. त्यानंतर परशुराम महाराज देखील आमच्या घरी आले. परशुराम महाराज यांनी माझ्या दिराला या घरामध्ये ३६ किलो सोने आहे मी तुला ते काढुन देतो ४० लाख रुपये मला द्या असे सांगितले. त्यानंतर माझ्या दिराने ऐवढे पैसे माझ्याकडे नाहीत असे सांगुन ३० लाख रुपये देण्याचे कबुल केले व ते टप्या टप्याने देण्याचे ठरले. माझ्या दिराने टप्या टप्याने परशुराम महाराज यांना ३० लाख रुपये दिले होते. त्यानंतर आरोपी आमच्या घरी येऊन होमहवन करुन चाल टिकल्या आम्हाला काढुन दिल्या. त्यानंतर परशुराम महाराज यांनी आमचा फोन उचलला नाही व आमच्या घरी देखील आले नाहीत. त्यानंतर माझ्या दिराने फिर्याद दाखल केली. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझा जबाब नोंदवला.

सरतपास पुर्ण.

**<u>उलट तपासणी आरोपी क्र.२, ३ व ४ करिता श्री. जे. टी. बटुळे वकील</u>**

२. आज कोर्टा येईपर्यंत नक्की काय प्रकार झाला याची मला वैयक्तीक माहिती नाही. दिर आणि वेगवेगळ राहतो. या केसबाबत मला जास्त काही माहिती नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर मी खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिराच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

...उलटतपास पुर्ण.

... फेर तपास ... काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2026.03.09 17:43:38 +0530

दिनांकः ०९.०३.२०२६

(**रविकिरण सपाटे** )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पाथर्डी जि. अहमदनगर.